**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रीय आरोग्य अभियानाला आणखी पाच वर्ष मुदतवाढ देण्याचा केंद्रीय मंत्रीमंडळाचा निर्णय

- राज्यात ३ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्यासाठी रिलायन्सचा राज्य सरकारसोबत सामंजस्य करार, ३ लाख रोजगार निर्माण होणार

- कालच्या घसरणीनंतर देशातले शेअर बाजार थोडे सावरले

**आणि**

- जळगाव-पाचोरा दरम्यान रेल्वे अपघातात ६ प्रवाशांचा मृत्यू

**<><><><><>**

राष्ट्रीय आरोग्य अभियानाला आणखी पाच वर्ष मुदतवाढ देण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात आला. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. यावेळी देशातल्या आरोग्य सोयीसुविधांचा आढावा त्यांनी घेतला. गेल्या तीन वर्षांत, राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत माता आणि बाल आरोग्य, रोग निर्मूलन आणि आरोग्यसेवा पायाभूत सुविधांसह अनेक क्षेत्रांमध्ये लक्षणीय प्रगती केल्याचं यावेळी सांगण्यात आलं.

२०२५-२६ च्या हंगामासाठी कच्च्या तागाच्या किमान हमीभावात ६ टक्क्याची वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याची माहिती पीयूष

गोयल यांनी यावेळी दिली. तागाला ५ हजार ६५० प्रति क्विंटल इतका हमीभाव देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. हा हमीभाव लागवड खर्चापेक्षा ६७ टक्के अधिक असून याचा लाभ ईशान्य भारतातल्या ४० लाख कुटुंबांना होणार असल्याचं गोयल यांनी सांगितलं.

<><><><><>

दावोसमध्ये सुरू असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या गुंतवणूक परिषदेच्या दुसऱ्या दिवशी राज्यात आणखी ३ लाख ५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार झाला. रिलायन्स सोबत झालेल्या या करारातून ३ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. यामुळं राज्यानं केलेल्या सामंजस्य करारांचं मूल्य ९ लाख ३० हजार कोटी रुपयांहून अधिक झालं आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

याशिवाय ह्युंदाई, डीपी वर्ल्ड, सिस्को, ब्रिटनचे माजी प्रधानमंत्री टोनी ब्लेअर, NTT DATA या कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी फडणवीस आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी चर्चा केली. या कंपन्यांही राज्यात गुंतवणूक करण्यासाठी इच्छुक आहेत.

<><><><><>

अमरावती, अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यात, तसंच वर्धा जिल्ह्याच्या आर्वी उपविभागात यंदाच्या पावसाळ्यात संत्रा पिकाच्या फळगळतीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी विशेष बाब म्हणून १६५ कोटी ८३ लाख

८ हजार रुपयांची मदत राज्य शासनानं मंजूर केली आहे. मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी ही माहिती दिली.

<><><><><>

पुणे आणि पिंपरी- चिंचवड महापालिका क्षेत्रात गेल्या दोन आठवड्यांपासून अचानक जीबीएस, अर्थात 'गुलियन बॅरी सिंड्रोम' या आजाराचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. जीबीएस हा चेतासंस्थेशी संबंधित दुर्मिळ आजार आहे. पुण्यातला सिंहगड रस्ता, धायरी, नऱ्हे, विश्रांतवाडी, पर्वती, कसबा, कोथरूडसह उपनगर आणि ग्रामीण भागात या आजाराची लागण झालेले रुग्ण आढळून येत आहेत. २४ रुग्णांवर वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यापैकी काहीजण अतिदक्षता विभागात असून दोन कृत्रिम श्वसोच्छवास प्रणालीवर आहेत.

या आजाराचं गांभिर्य लक्षात घेता त्यामुळे पालिका प्रशासन आणि राज्य सरकारनं ही परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी पावलं उचलावीत, अशी अपेक्षा ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, रुग्ण आढळले आहेत त्या भागात महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सर्वेक्षण केलं जात असून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. या आजाराचं विश्लेषण करण्यासाठी नऊ जणांची समिती नेमली आहे. खबरदारी म्हणून नागरिकांनी पाणी उकळून प्यावं, असं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

<><><><><>

भारतीय टपाल विभागानं आपल्या दीडशे वर्षांहून अधिक काळाच्या वाटचालीत संवेदनशील सेवा देऊन लोकांशी भावनिक नाते जोपासले

असल्याचं राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. ते आज भारतीय डाक विभागाच्या महाराष्ट्र परिमंडळातर्फे आयोजित राज्यस्तरीय डाक तिकीट प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. मुंबईच्या जागतिक व्यापार केंद्रात पुढील चार दिवस हे प्रदर्शन सुरु राहणार आहे. यावेळी राज्यपालांच्या हस्ते नाशिक येथील पांडव लेणी वरील स्थायी चित्रे, मूलचंद जी शाह यांच्या जीवनावर आधारित कस्टमाइज्ड माय स्टॅम्प ॲप महापेक्सच्या बोधचिन्हाचही उद्घाटन करण्यात आलं.

<><><><><>

अमेरिकेतल्या व्यापार शुल्काबाबतची अनिश्चिती कमी झाल्यानंतर गेले काही दिवस कोसळणारे भारतीय शेअर बाजार आज काहीसे सावरले. दिवसभरात सेन्सेक्स आणि निफ्टीत चढ उतार राहिले. बाजार बंद होताना सेन्सेस्क्स ५६६ अंकानी वधारला आणि ७६ हजार ४०५ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १३१ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार १५५ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

जळगाव-पाचोरा दरम्यान परधाडे गावाजवळ आज झालेल्या रेल्वे अपघातात ११ प्रवाशांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाल्याचं खासदार स्मिता वाघ यांनी सांगितलं. या मार्गावरुन चाललेल्या पुष्पक एक्सप्रेसच्या डब्याला आग लागल्याच्या अफवेनं जीव वाचवण्यासाठी प्रवाशांनी पुष्पक एक्सप्रेसमधून उड्या मारल्या. मात्र त्याचवेळी समोरून

येणाऱ्या बंगळुरू एक्सप्रेसखाली सापडल्यानं अनेकांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. तर अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून समाजमाध्यमावर मृतांना आदरांजली वाहिली आहे. मंत्री गिरीश महाजन, तसंच पोलिस अधीक्षक घटनास्थळी पोहोचले आहेत. जिल्हा प्रशासन रेल्वे प्रशासनाशी समन्वयानं काम करत असून, जखमींच्या उपचारासाठी तातडीनं व्यवस्था केली जात असल्याचं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्गासाठी मराठवाड्यात भूसंपादन प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने पर्यावरणीय परवानग्या मागितल्या आहेत. शक्तिपीठ महामार्ग वर्धा जिल्ह्यातल्या पवनार इथून सुरू होणार असून महाराष्ट्र-गोव्याच्या सीमेवरील पत्रादेवी इथं संपणार आहे.

<><><><><>

बीड जिल्ह्याती मस्साजोग इथल्या सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे याची माहिती देणाऱ्याला पोलिसांनी बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे. कृष्णा आंधळे आधीच्याही एका गुन्ह्यात फरार असल्याचं पोलिसांनी सांगितलं. या प्रकरणात अटकेत असलेले वाल्मिक कराड याच्यासह विष्णु चाटे, सुदर्शन घुले, सुधीर सांगळे महेश केदार, प्रतीक घुले, जयराम चाटे, सिद्धार्थ सोनवणे यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

**<><><><><>**

मुलींची सुरक्षितता, शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी राबवण्यात येणाऱ्या बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेला आज दहा वर्षं पूर्ण झाली. त्यानिमित्त येत्या महिला दिनापर्यंत म्हणजेच ८मार्चपर्यंत दशकपूर्ती अभियान राबवण्यात येणार आहे. आज राज्यात ठिकठिकाणी अभियानाचा प्रारंभ करणारे कार्यक्रम झाले.

**नाशिक** महानगरपालिकेत आयोजित कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्तांनी उपस्थितांना बेटी बचाव बेटी पढाओ अभियानाची शपथ दिली. याविषयी बोलताना नाशिक महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद म्हणाले

**होल्ड - नाशिक योगेश कमोद**

**धुळ्यात** जनजागृती रॅलीने अभियानाला सुरुवात झाली. **परभणीतही** कार्यक्रम आयोजित झाला होता.

**<><><><><>**

नाशिकमध्ये उद्यापासून महाराष्ट्र विरुद्ध बडोदा या दोन संघांदरम्यान रणजी ट्रॉफी क्रिकेट सामन्याला सुरुवात होत आहे. नूतनीकरण झालेल्या हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर प्रथमच हा सामना होत आहे.

**<><><><><>**

राज्यात येत्या दोन दिवसात हवामान कोरड राहिल, असा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रात तापमानात किंचीत वाढ झाली असून मराठवाडा आणि विदर्भात हवामानात घट झाली आहे.

राज्यात सर्वात कमी तापमान ब्रम्हपुरी इथं १२ पूर्णांक ४ दशांश नोंदवलं गेलं.

<><><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यादरम्यान पाच सामन्यांच्या टी ट्वेंटी  मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

//<><><><><>//